# <u>प्रेस नोट</u>

## जांभे (मुळशी) येथे अनधिकृत आरएमसी प्लँटवर पीएमआरडीएचा हातोडा!

### - महानगर आयुक्तांच्या आदेशाने धडक कारवाई; तहसीलदार, अभियंते, पोलिसांच्या उपस्थितीत बांधकाम जमीनदोस्त

पुणे - पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) बेकायदा बांधकामांविरोधात आपली मोहीम तीव्र केली असून, मंगळवारी थेट मुळशी तालुक्यातील मौजे जांभे येथील एका अनधिकृत आरएमसी (Ready Mix Concrete) प्लँटवर धडक कारवाई केली. प्रशासनाने कोणतीही भीड न ठेवता हे संपूर्ण अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त केले.

विकास प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात मागणी असलेल्या, मात्र बेकायदा उभारलेल्या या प्लँटवर पीएमआरडीएने मंगळवारी दुपारी बुलडोझर चालवला. महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिलेल्या कठोर आदेशानुसार आणि सह-आयुक्त दीप्ती सूर्यवंशी यांच्या अचूक मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज होती. यावेळी तहसीलदार आशा होळकर या स्वतः उपस्थित होत्या. त्यांच्यासोबत पीएमआरडीएचे शाखा अभियंते आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पीएमपीआरडीएच्या या सडेतोड भूमिकेमुळे अनधिकृतरीत्या आरएमसी प्लँट उभारणी करणाऱ्या व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत. पीएमआरडीएची ही मोहीम यापुढेही सुरू राहणार असून, बांधकाम व्यावसायिकांनी नियमांचे पालन करावे, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा सह-आयुक्त दीप्ती सूर्यवंशी यांनी दिला आहे.

------------

**मा. संपादक/ प्रतिनिधी**

कृपया, उपरोक्त वृत्त आपल्या दैनिक/वृत्तवाहिनी, डिजीटल मीडियातून प्रसिद्धीस द्यावे, ही विनंती.

**पुरुषोत्तम सांगळे**

माहिती व जनसंपर्क अधिकारी

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे